शब्दांचा अवकाश



जयंत नारळीकर

jayant@iucaa.ernet.in

# ‘आर्यभट्ट’ नव्हे; ‘आर्यभट’!

आपले पूर्वज किती प्रगत होते, याबद्दल आपण भारतीय फुशारक्या मारण्यात पुढं असतो; पण त्या आपल्या अभिमानास्पद पूर्वजांची माहिती आपल्याला असते का? ती करून घेण्याचा प्रयत्न आपण करतो का ?



‘आयुका’च्या आवारातला आर्यभटाचा पुतळा. वास्तविक, आर्यभट कसा दिसत होता, याची माहिती उपलब्ध नाही; परंतु त्या काळच्या सामान्य माहितीवरून हा पुतळा साकारण्यात आला आहे.

मुंबईत एका प्रतिष्ठित कंपनीत लेबर ऑफिसर म्हणून नावाजलेले (कै.) बाळासाहेब राजवाडे यांच्याकडून ऐकलेला हा किस्सा. एक दिवस त्यांच्याकडे कामगार संघटनेचे पदाधिकारी तावातावानं आले आणि गाऱ्हाणं मांडू लागले. त्या पदाधिकाऱ्यांच्या तक्रारीचा सारांश असा : कंपनीच्या अधिकाऱ्यानं आपल्या राष्ट्रीय ध्वजाचा अपमान केला आहे व त्याच्या निषेधार्थ संघटना कामगारांचा संप घडवून आणू इच्छिते.

राजवाडे यांना त्या अधिकाऱ्याबद्दल माहिती होती व त्याच्याकडून असं कांही कृत्य घडणार नाही, याची खात्री होती; पण काहीतरी निमित्त करून संप घडवून आणू इच्छिणाऱ्या संघटनेला शांत कसं करायचं? त्यासाठी बाळासाहेबांना एक उपाय सुचला. तो असा : त्यांनी पदाधिकाऱ्यांना विचारलं, ‘राष्ट्रीय ध्वजाबद्दल तुम्हाला असलेली आपुलकी स्तुत्य आहे; पण ध्वजात सर्वांत वरचा रंग कोणता, हे तुम्ही मला सांगू शकता का ?’

हा प्रश्न ऐकून संघटनेचे नेते-पदाधिकारी गडबडून गेले. हिरवा की भगवा, याबद्दल त्यांची खात्री होईना. ते पाहून बाळासाहेब म्हणाले : ‘‘ज्या ध्वजाची तुम्हाला स्वतःलाच माहिती नाही, त्याचं निमित्त करून काम थांबवणं तुम्हाला योग्य वाटतं का?’’

त्यावर निरुत्तर झालेले नेते-पदाधिकारी तिथून निघून गेले.

*****

मला हा किस्सा आठवला तो वेगळ्या संदर्भात. आपले पूर्वज किती प्रगत होते, याबद्दल आपण भारतीय फुशारक्या मारण्यात पुढं असतो; पण त्या आपल्या अभिमानास्पद पूर्वजांची माहिती आपल्याला असते का? दुर्दैवानं या प्रश्नाचं उत्तर नकारार्थी द्यावं लागतं.एक उदाहरण खूप बोलकं आहे. पाचव्या शतकातला खगोलशास्त्रज्ञ आर्यभट की आर्यभट्ट? त्यानं नेमकं काय काम केलं?

पहिला प्रश्नच ‘गुगली’प्रमाणे आपली विकेट घेऊन जातो. आपल्याला त्याचं नाव नक्की काय होतं, ते सांगता येऊ नये?वास्तविक, या प्रश्नाचं उत्तर त्याच्या एकमेव पुस्तकात मिळतं. पुस्तकाचं नाव आहे ‘आर्यभटीयम्’, म्हणजे आर्यभटानं रचलेलं. इथं कुठं ‘ट्ट’चा मागमूसही नाही. पुस्तकात दोन ठिकाणी लेखकानं स्वतःचं नाव दिलेलं आहे. पाहा,

संदर्भ : प्रकरण १, श्लोक क्रमांक १ आणि प्रकरण २, श्लोक क्रमांक १. दोन्ही ठिकाणी नाव आहे ‘आर्यभट’.समजा असं गृहीत धरू, की मूळ नाव आर्यभट्ट होतं, ते अपभ्रंशानं आर्यभट झालं; पण ‘ट’चा ‘ट्ट’ केलात, तर ते कवितेच्या छंदाला मानवत नाही. तेव्हा ‘ट्ट’वाल्यांना ही पळवाट मोकळी नाही.

मी इथं हेही कबूल करतो, की मी स्वतः याबाबतीत हीच चूक करत असे. ‘आर्यभटीयम्’ उपलब्ध झाल्यावर, खरं काय आहे, ते मला कळलं.

*****

आता ‘नाम’ सोडून ‘काम’ पाहू या. आर्यभटानं म्हटलं आहे, की पृथ्वी आपल्या आसाभोवती पश्चिम ते पूर्व फिरते; ज्यामुळं स्थिर तारामंडळ पूर्वेपासून पश्चिमेकडे जाताना दिसतं. याचं वर्णन करताना त्या काळच्या वाचकाला समजेल, अशी उपमा त्यानं दिली आहे. नावेतून जाणाऱ्याला काठावरच्या स्थिर वस्तू उलट्या दिशेनं जाताना दिसतात, तसाच हा प्रकार आहे. पाहा, : संदर्भ : प्रकरण ४, श्लोक ९.

वास्तविक पृथ्वीच्या दोन गती आहेत. एक आत्ताच वर्णिलेली, तर दुसरी सूर्याभोवतालची. कोपर्निकसनं सोळाव्या शतकात या दोन्ही गतींची चर्चा करणारं सविस्तर पुस्तक लिहिलं आहे. यातल्या दुसऱ्या गतीची चर्चा करताना आपल्यापैकी काही अतिउत्साही लोक असं विधान करतात, की आर्यभटाला याची कल्पना होती.

या विषयावर माझं मत विचारलं, तर माझं उत्तर ठरलेलं आहे : ‘कृपया मला संदर्भ दाखवा.’ असं म्हटल्यावर प्रश्नकर्ता गप्प बसतो. कारण, ऐकीव माहितीवर आधारित माहितीला पुरावा कसा मिळवणार? एरवी ११८ श्लोकांच्या ‘आर्यभटीयम्’मध्ये हा श्लोक खरोखर असेलच, तर तो सापडायला उशीर लागू नये! पण आर्यभटानं पृथ्वीच्या आसाभोवतालच्या

परिभ्रमणाची केलेली चर्चा त्याच्या समकालिनांना, तसंच त्यानंतरच्या पिढ्यांना भावली नाही. ब्रह्मगुप्तासारख्या कर्तृत्ववान खगोल पंडितानं तर आर्यभटाची या संदर्भात टर उडवली आहे.


याचं कारण असं देण्यात येतं- ग्रीक आक्रमणकर्ता अलेक्झांडर याच्याबरोबर आणि पश्चात आलेल्या विचारावंतांच्या प्रभावामुळे काही ग्रीक विचार भारतीय जनमानसात रुजले. हे वैचारिक आक्रमण मूळ आक्रमणापेक्षा अधिक चिरस्थायी

ठरलं. अशा ग्रीक विचारप्रवाहानुसार, पृथ्वी स्थिर असून, ब्रह्मांड तिच्याभोवती फिरतं.

आर्यभटाचं द्रष्टेपण नावाजताना त्याच्या धैर्याकडं दुर्लक्ष करता कामा नये... प्रचलित विचारप्रवाहाविरुद्ध जाण्याचं साहस निवडक लोकच करू शकतात.

*****

‘आर्यभट विरुद्ध आर्यभट्ट’ हा वाद बाजूला सारण्यापूर्वी एक गोष्ट मला सखेद नमूद करावीशी वाटते. नैनिताल वेधशाळेचं पुनरुज्जीवन करून केंद्र सरकारनं ‘आर्यभट्ट’ याच्या नावानं नव्या संशोधन संस्थेची स्थापना केली. मात्र, एखाद्या संस्थेला आपण ज्याचं नाव सन्मानानं देत आहोत, त्याचं ते नाव योग्य स्वरूपात दिलं जात आहे ना, याविषयीची खात्री आपल्या सार्वभौम सरकारनं नामकरणापूर्वी करून घ्यायला नको होती का?




‘आर्यभटीय’च्या अलीकडच्या आवृत्तीचं मुखपृष्ठ.

रामबाण

महाराष्ट्राची
‘शोभा’ घालवत
अकलेचे ‘तारे’ तोडते...
‘डे’ट्टे
मुंबईत
राहून
‘विंग्रजी’त
मराठी फाडते...